# ४. सामाजिक संस्था


४.१ सामाजिक संस्थाः व्याख्या आणि वैशिष्ट्ये

४.२ कुटुंब

४.३ विवाह

४.४ अर्थव्यवस्था आणि काम

४.५ शिक्षण


## प्रस्तावना

व्यक्ती आणि समाज यांतील सहसंबंध समजून घेणे हा समाजशास्त्राचा महत्त्वाचा हेतू आहे. कॉम्त, डरखाईम, मार्क्स आणि वेबर यांसारख्या समाजशास्त्रातील प्रमुख विचारवंतांच्या लिखाणातून मानवप्राण्याचे समाजशील स्वरूप अधोरेखित होते. व्यक्तींचे एकमेकांबरोबर असणारे सहसंबंध आणि आपले सामाजिक अस्तित्व हा मानवी समाजाचा मूलभूत पैलू आहे. समाज आणि व्यक्ती हे अविभाज्य घटक आहेत. व्यक्तींमधील आंतरक्रिया व आंतरसंबंधांतूनच समाज घडत असतो, तर दुसरीकडे व्यक्ती ज्या विविध भूमिका पार पाडत असतात, जो दर्जा धारण करतात, ज्या मूल्यांचा पाठपुरावा करत असतात व ज्या नियमनांच्या चौकटीत वावरत असतात त्या सर्वांतून व्यक्तींमध्ये समाजाचे अस्तित्व असतेच.

व्यक्ती आणि समाज यांमधील सहसंबंध स्पष्ट करण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक संस्था ही मूलभूत संकल्पना वापरली आहे. सामाजिक संस्था हा मानवी समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य, प्रसारमाध्यमे, कायदा आणि अर्थव्यवस्था अशा विविध सामाजिक संस्थांमधून समाज बनलेला आहे.

या सामाजिक संस्थांचे सदस्य म्हणूनच व्यक्ती-व्यक्तींमधील आंतरक्रिया घडत असतात. कुटुंब आणि नातेसंबंधांच्या जाळ्यांमधून पुनरुत्पादन व समाजीकरणांचे कार्य कसे होते; वस्तू व सेवांच्या उत्पादन आणि वितरणाचे काम बाजारपेठ आणि अर्थव्यवस्था कसे पार पाडते; तसेच सामाजिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कायदा व राजकीय व्यवस्थेतून कशी पार पाडली जाते अशा सोप्या उदाहरणांतून सामाजिक संस्था ही संकल्पना समजावून घेण्याचा प्रयत्न या पाठातून आपण करणार आहोत. थोडक्यात, व्यापक सामाजिक जीवनाच्या दृष्टीने व्यक्तींच्या वर्तनात समन्वय राखण्याचे कार्य सामाजिक संस्था करतात.

## ४.१ सामाजिक संस्था : व्याख्या आणि वैशिष्ट्ये

### ४.१.१ व्याख्या

*(१) हॉर्टन आणि हंट :* "समाजाच्या मूलभूत गरजा ज्या नियम आणि प्रक्रियांच्या मार्फत भागवल्या जातात अशा सहसंबंधांच्या संघटित व्यवस्थेला सामाजिक संस्था असे म्हणता येईल."

*(२) इ. एस्. बोगार्डस :* "समाजामध्ये व्यक्तींच्या गरजा भागवणाऱ्या सुनिश्चित स्वरूपाच्या प्रक्रियांची संरचना म्हणजे सामाजिक संस्था होय."

*(३) एच. ई. बार्नेस :* "मानवी गरजा भागवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बहुविध क्रिया-प्रक्रियांना संघटित, मार्गदर्शित व कार्यान्वित करणाऱ्या सामाजिक संरचना व यंत्रणा म्हणजे सामाजिक संस्था होय."

### ४.१.२ सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये

(i) सामाजिक संस्था म्हणजे सुस्पष्ट, स्थिर स्वरूपाच्या वर्तन पद्धतींची व्यवस्था होय.

(ii) व्यक्तींच्या सामूहिक क्रियांवर सामाजिक संस्था

अवलंबून असतात.

(iii) सामाजिक संस्थांच्या माध्यमातून एका स्थिर नियमनात्मक संरचनेची म्हणजेच नियम व नियंत्रकांची व्यवस्था कार्यरत असते.

(iv) स्थिर वर्तन पद्धती आणि नियंत्रणात्मक संरचनेच्या माध्यमातून सामाजिक संस्था व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवत असतात तसेच व्यक्तींचे वर्तन सुकर करत असतात.

(v) व्यक्तींच्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी सामाजिक संस्था निर्माण होतात.

समाजशास्त्रात सामाजिक संस्थांचा विचार 'प्रकार्यवादी' व 'संघर्षवादी' अशा दोन प्रमुख दृष्टिकोनांनुसार केला जातो.

**प्रकार्यवादी दृष्टिकोन** – मानवी सामाजिक जीवन सुकर करण्यामध्ये सामाजिक संस्था विविध प्रकारची भूमिका पार पाडत असतात. समाजाच्या विशिष्ट स्वरूपाच्या गरजा भागवत असतात. प्रकार्यवादी दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था म्हणजे दर्जा व भूमिकांचे गुंतागुंतीचे जाळे असते, तसेच समाजाच्या विविधांगी गरजा लक्षात घेऊन निर्माण झालेली मूल्ये, श्रद्धा आणि सामाजिक नियमानांची व्यवस्था असते. या दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था त्यांची स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी एकमेकांवर अवलंबून असतात. तसेच बदलत्या गरजांनुसार बदलती कार्ये करतात आणि/किंवा एकाच वेळी विविध स्वरूपाची कार्ये पार पाडतात.

**संघर्षवादी दृष्टिकोन** – समाजात सर्व व्यक्ती एकसमान पातळीवर नसतात. संधी आणि सुविधांचे वितरण असमान स्वरूपाचे असते. ते बऱ्याचदा समाजातील प्रभावी गटांच्या सोईचे असते. या दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था नेहमीच सामाजिक विभाजन आणि असमानता टिकवून ठेवण्यात योगदान देत असतात. समाजातील वर्चस्ववादी समूहांचे हितसंबंध जोपासण्याचे काम करत असतात.

## ४.२ कुटुंब

कुटुंब हा मानवी समाजाचा अत्यंत महत्त्वाचा प्राथमिक घटक आहे. कुटुंबाला मानवी समाजाची आधारशीला मानले जाते. कुटुंब ही समाजातील सर्वांत सूक्ष्म (लहान) स्वरूपाची संस्था आहे. कुटुंबाशिवाय समाजाची कल्पना करणे कठीण आहे. व्यक्ती आणि संपूर्ण समाज अशा दोन्ही स्तरांवर कुटुंब महत्त्वाचे आहे. म्हणूनच सर्वसामान्यतः कुटुंब ही एक सार्वत्रिक तसेच मानवी समाजातील अविभाज्य सामाजिक संस्था मानली जाते. कुटुंबात राहणाऱ्या व्यक्तींसाठी एक सामाजिक रचना म्हणून कुटुंब विविध स्वरूपाची भूमिका पार पाडत असते. कुटुंबात आर्थिक गरजा भागवल्या जातात, मुलांना समाजाचा सदस्य म्हणून वाढवण्याची जबाबदारी पार पाडली जाते, भावनिक आधार दिला जातो. यादृष्टीने प्रेम, जिव्हाळा व प्रोत्साहन देणारी आदर्श रचना म्हणून कुटुंबाकडे पाहता येईल.

कधीकधी असेही दिसून येते की, कुटुंबातील सर्वच सदस्यांच्या गरजा तितक्याच प्रकर्षाने भागवल्या जात नाहीत. कुटुंबात वेदना व हिंसेचा अनुभवही येऊ शकतो. अलीकडील काळात विकसित झालेल्या दृष्टिकोनांनी कुटुंबाच्या सार्वत्रिकतेला व अपरिहार्यतेला आव्हान दिलेले दिसते. या नवीन संशोधनातून असे दिसून येते की, कुटुंबाची रचना समाजागणिक बदलते, या रचनेत वैविध्य आहे. तसेच आज कुटुंबाची परंपरागत कार्ये व स्वरूप प्रकर्षाने बदलत आहे.

### ४.२.१ व्याख्या

***(१) मॅक आयव्हर :*** "लैंगिक संबंधावर आधारित मुलांचे संगोपन व पालनपोषण करणारा सुस्पष्ट व स्थिर स्वरूपाचा समूह म्हणजे कुटुंब होय."

***(२)बर्जेस व लॉक :*** "विवाह, रक्तसंबंध अथवा दत्तक विधानाच्या संबंधातून एकमेकांशी बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे कुटुंब होय. कुटुंब म्हणजे एकाच घरात रहाणाऱ्या, आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी, भाऊ-बहीण अशा नात्यांनी एकमेकांबरोबर बांधल्या गेलेल्या व त्यातून एक समान संस्कृती निर्माण करणाऱ्या व्यक्तींचा समूह."

***(३)वेबस्टर डिक्शनरी :*** "रक्तसंबंध किंवा विवाह संबंधांतून एकमेकांशी जोडल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे कुटुंब होय."

थोडक्यात, कुटुंब म्हणजे रक्तसंबंध, विवाहसंबंध अथवा दत्तक प्रक्रियेसारख्या सामाजिक संबंधातून निर्माण झालेली व मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी वाहणारी प्रमुख सामाजिक संस्था होय.

**किबुत्झ पद्धती : कुटुंब ही खरंच सार्वत्रिक संस्था आहे?**

किबुत्झ पद्धती दुसऱ्या महायुद्धानंतर इस्त्राईलमध्ये निर्माण झालेली कुटुंब पद्धती आहे. कुटुंबाच्या सार्वत्रिक स्वरूपाला किबुत्झ पद्धती हा एक प्रकारे अपवादच आहे. सामूहिक जीवन, सामूहिक मालमत्ता व मुलांचे सामूहिक पालनपोषण अशा तत्त्वांवर ही पद्धती आधारित आहे. विभक्त कुटुंबाचे आर्थिक सहकार्य आणि एकत्र निवास ही ठळक वैशिष्ट्ये किबुत्झमध्ये आढळत नाहीत. जोडप्यांनी केलेल्या कामाचा मोबदला त्यांच्यापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समूहाच्या उपयोगाचा असतो. तसेच जोडप्यांना जरी एकलैंगिक नातेसंबंध ठेवण्याची मुभा असली तरी मुलांचे संगोपन ही संपूर्ण समूहाची जबाबदारी असते. या प्रकारची सामूहिक जीवनपद्धती इस्त्राईली समाजाची ओळख जरी नसली तरी एक पर्यायी पद्धती म्हणून ओळखली जाण्याइतकी निश्चित प्रस्थापित आहे.

### ४.२.२ कुटुंबाची कार्ये

अभिजात प्रकार्यवादी दृष्टीकोनानुसार समाजासाठी काही अविभाज्य कार्ये पार पाडणारा समाजाचा घटक म्हणजे कुटुंब. कुटुंबाची ही मूलभूत कार्ये थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील:

**(१)सामाजीकरण :** कुटुंब हा सामाजीकरणाचा मूलभूत घटक आहे. टॅलकॉट पार्सन्स यांच्या मते, मुलांचे प्राथमिक सामाजीकरण करण्याची मूलभूत गरज कुटुंबातून भागवली जाते. समाजातील सामाजिक मूल्य आणि नियमनांप्रमाणे मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवणे या महत्त्वाच्या गोष्टीचा यात समावेश होतो. सामाजीकरणाच्या निरंतर प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका फार महत्त्वाची आहे. मुलं जितकं आपल्या पालकांकडून शिकतात, तितकेच पालकंही आपल्या मुलांकडून व मुलांना वाढवण्याच्या प्रक्रियेतून शिकत असतात. (पाचव्या पाठात कुटुंबाच्या सामाजीकरणाचा मुख्य घटक म्हणून असलेली भूमिका विस्तृत दिलेली आहे.)

**(२)लैंगिक वर्तनाचे नियंत्रण :** मरडॉक यांच्या मते, कुटुंबाच्या माध्यमातून व्यक्तींना लैंगिक इच्छा आणि आकांक्षा व्यक्त करण्याचे तसेच लैंगिक समाधानाचे साधन मिळते. याचबरोबर, विवाहबाह्य लैंगिक संबंधांवर अंकुश लावून व त्यासंदर्भातील नियम तयार करून समाजात नियंत्रण व स्थिरता आणण्याची जबाबदारी कुटुंबातून पार पाडली जाते. प्रत्येक संस्कृतीत नातेसंबंधांची व्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीनेच लैंगिक वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. याच दृष्टीने अगदी जवळच्या नातलगांमधील लैंगिक संबंधांना मनाई असते. नियमांच्या या चौकटीत कोणते आप्त-नातेवाईक येतात हे संस्कृतीनुसार बदलू शकते. पण कुटुंब आणि

नातेसंबंधाच्या व्यवस्थेतून लैंगिक व प्रजननाच्या प्रक्रियेवर निश्चित स्वरूपाचे नियंत्रण असते.

**(३)भावनिक आधार :** कुटुंबात सदस्यांना शारीरिक संरक्षण, भौतिक मदत आणि भावनिक आधार दिला जातो. कुटुंबातील नाती खूप प्राथमिक व जवळच्या संबंधावर आधारित असल्यामुळे 'बाहेरच्या निष्ठुर जगात जगण्याचे बळ देणारे आश्रयस्थान' असे कुटुंबाचे वर्णन केले जाऊ शकते. कुटुंबात व्यक्तीला वात्सल्य, सहकार्य, स्वीकृती व आधार या गोष्टी मिळत असतात. पार्सन्सने म्हटल्याप्रमाणे यातून प्रौढ सदस्यांच्या व्यक्तिमत्त्वालाही स्थिरता प्राप्त होते. आधुनिक जगातील वाढत्या ताण-तणावांना यशस्वीरीत्या सामोरे जाण्याच्या दृष्टीने कुटुंबात मिळणारा भावनिक आधार महत्त्वाचा आहे.

**(४)आर्थिक स्थैर्य :** प्रत्यक्ष आर्थिक उत्पादनाचे काम आता कुटुंबातून फारसे होत नसल्यामुळे एक आर्थिक केंद्र म्हणून कुटुंबांचे महत्त्व थोडे कमी झाले आहे. जुन्या काळाप्रमाणे आधुनिक काळात कुटुंबाचे सदस्य उत्पादनाचे काम एकत्रितपणे करत नाहीत. पण तरीही कुटुंबात सदस्यांना एकप्रकारे आर्थिक स्थैर्य निश्चित मिळत असते. कारण कुटुंबात आर्थिक आणि भौतिक साधने पुरवली जातात, मालमत्ता निर्माण व जतन केली जाते.

**(५)सामाजिक ओळख :** कुटुंबामुळे सदस्यांना एक सामाजिक ओळख प्राप्त होते. वंश, वांशिकता, धर्म, जात आणि सामाजिक वर्गावर आधारित असणारा अर्पित दर्जा व्यक्तीला विशिष्ट कुटुंबात त्याच्या होणाऱ्या जन्मामुळे मिळतो. पालकांकडून मुलांना सामाजिक वारसा मिळत असतो. म्हणूनच व्यक्तीचे समाजातील स्थान निश्चित करण्यात कुटुंब महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

वरील सर्व कार्यांचा सर्वंकष विचार केला तर, कुटुंबाला समाजाचा कणा का मानले जाते ते लक्षात येईल.

### ४.२.३ कुटुंबाचे प्रकार

संरचनेच्या आधारे कुटुंबाचे दोन ढोबळ प्रकार पडतात.

**(अ) संयुक्त कुटुंब :** एकाच छताखाली वास्तव्य करणाऱ्या व सामाईक स्वयंपाकघर वापरणाऱ्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त पिढ्यांच्या कुटूंबाला 'संयुक्त कुटुंब' असे म्हटले जाते. भारतातील ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संयुक्त कुटुंबपद्धती होय. संयुक्त कुटुंबाला कधीकधी विस्तारित कुटुंब असेही म्हटले जाते.

**(ब) विभक्त कुटुंब :** पालक आणि मुले अशा फक्त दोन पिढ्यांचे कुटुंब म्हणजे विभक्त कुटुंब. विभक्त कुटुंबे बहुतांशी शहरी भागात दिसून येतात.



विभक्त व संयुक्त कुटुंब

कुटुंबांतर्गत अधिकाराच्या आधारे कुटुंबाचे मातृसत्ताक व पितृसत्ताक असे दोन ढोबळ प्रकार पडतात.

- **मातृसत्ताक कुटुंब**
- **पितृसत्ताक कुटुंब**

| अ.क्र. | मातृसत्ताक कुटुंब | पितृसत्ताक कुटुंब |
|---|---|---|
| १. | **मातृसत्ताक** कुटुंबात ज्येष्ठ स्त्री/आईकडे अधिकाराची सूत्रे असतात. तीच कुटुंब प्रमुख असते. | **पितृसत्ताक** पद्धतीत घरातील ज्येष्ठ पुरूषाला कुटुंब प्रमुख मानले जाते आणि अधिकारांची सूत्रे त्याच्याच हातात असतात. |
| २. | मातृसत्ताक कुटुंब **मातृवंशीय** पद्धतीचे असते. म्हणजे कौटुंबिक वारसा मातृकुलाकडून येतो. | पितृसत्ताक कुटुंब हे **पितृवंशीय** असते. म्हणजे वारसा हा प्रामुख्याने पित्याच्या वंशाकडून येतो. |
| ३. | विवाहानंतर वर हा वधुच्या घरी रहायला येत असल्यामुळे मातृसत्ताक पद्धतीत कुटुंब **मातृगृहीय** असते. | पितृसत्ताक कुटुंब **पितृगृहीय** असते, म्हणजेच विवाहानंतर नवपरिणित जोडपे वराच्या घरी रहायला जाते. |
| ४. | **आईकडचे आडनाव** धारण करण्याची पद्धत असते. | पितृसत्ताक पद्धतीत **वडिलांकडचेच आडनाव** पिढ्यान् – पिढ्या पुढे चालत रहाते. |
| ५. | उत्तर-पूर्व भारतातील गारो व खासी आदिवासी समूह तसेच दक्षिण भारतातील नायर समुदायात मातृसत्ताक कुटुंब पद्धती आहे. | भारतात तसेच जगातील बहुतेक भागात सर्वांत प्रचलित कुटुंब पद्धती पितृसत्ताक आहे. |

## ४.२.४ एकविसाव्या शतकातील कुटुंब

प्रत्येक मानवी समाजाची आधारशीला असलेल्या कुटुंबपद्धतीमध्ये आज खूप मोठे बदल होत आहेत. अनेक नवीन प्रकार निर्माण होत आहेत. पालकत्व, रोजगार आणि विश्रांती अशा विविध प्रकारच्या दैनंदिन क्रिया-प्रक्रियांचे केंद्र म्हणजे कुटुंब असते. समाजात जेव्हा व जसजसे परिवर्तन होते त्याप्रमाणे कुटुंबालाही नवीन संरचना व प्रक्रियांशी जुळवून घ्यावे लागते. आधुनिक समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे घटस्फोटाचे वेगाने वाढत जाणारे प्रमाण होय. लग्न करण्याचे सर्वसाधारण वयदेखील वाढत आहे. तसेच अविवाहित रहाणाऱ्या व्यक्तींचे प्रमाणदेखील वाढत आहे. स्त्री शिक्षणाचा प्रसार व स्त्रियांचा रोजगारातील वाढता सहभाग यामुळे कुटुंबपद्धतीत बदल होत आहे. बालसंगोपनाच्या बदलत्या गरजा तसेच स्त्री-पुरुष दोघेही काम करत असल्यामुळे निर्माण झालेल्या नवीन गरजांना सामोरे जाण्याचे आव्हान कुटुंबांपुढे आहे. या सर्व बदलांचा परिणाम कुटुंब संस्थेवर निश्चित होत आहे. हे बदल ठळकपणे जरी पाश्चिमात्य देशांत दिसून येत असले आणि भारतासारख्या देशात अगदी प्रचलित होताना दिसत नसले तरी आज कुटुंब म्हणून जे नवीन नातेसंबंध उदयाला येत आहेत त्यांची चर्चा होणे आवश्यक आहे.

### एकल पालक कुटुंब :

बहुतांश एकल पालक असणाऱ्या कुटुंबांची प्रमुख आई/स्त्री असते. घटस्फोट, विभक्त होणे, मृत्यू किंवा अजाणतेपणी घेतलेल्या निर्णयामुळे एकच पालक असणारी कुटुंब निर्माण होतात. एकल पालक कुटुंबाची एक सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे. कारण भौतिक परिस्थिती किंवा सामाजिक अडथळे यांसारख्या घटकांमध्ये बरेच वैविध्य दिसून येते. पण एकल कुटुंबांमध्ये वाढणाऱ्या मुलांसाठी एका पालकाचा अभाव हा कठीण अनुभव असतो व त्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते, असे काही संशोधनातून दिसते.

### एकत्रित रहाणे/सहवास :

सहवास याचा अर्थ एखाद्या जोडप्याने

विवाहाशिवाय एकत्रित एकाच घरात रहाणे. अशा एकत्रित रहाण्याची परिणती लग्नात होऊ शकते अथवा नाही. सध्याच्या युवा पिढीत, विशेषतः युरोपच्या अनेक भागांत व भारताच्याही काही शहरी भागांत लग्नाशिवाय एकत्रित रहाण्याला पसंती दिली जात आहे. समलैंगिक जोडप्यांच्या बाबतीत हे जास्त करून दिसून येते.

**सावत्र पालकत्व :**

मृत्यू, घटस्फोट, कुटुंबांचे विभक्तीकरण अशा अनेक कारणांमुळे सावत्र पालक असणारे कौटुंबिक नातेसंबंध निर्माण होत आहेत. पुनर्विवाह किंवा एकत्रित रहाण्यामुळे नवीन कुटूंब उदयाला येते. या कुटुंबात पूर्वीच्या संबंधातील मुले आणि नवीन संबंधांतील मुले अशा दोन्हींचा समावेश असू शकतो. घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या वाढत्या प्रमाणामुळे सावत्र पालकत्वाच्या नवीन कौटुंबिक रचनेचा प्रसार होत आहे. अशा कुटुंबात वाढणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.



कुटुंब : समानतेच्या दिशेने

बदलत्या कौटुंबिक नातेसंबंध व रचनांची चर्चा करताना आपण लक्षात घेतले पाहिजे की, हे बदल प्रत्येक देश व समाजासाठी एकसारखे नाहीत. तितकेच महत्त्वाचे म्हणजे नवीन बदल जरी होत असले तरी पूर्वीच्या कौटुंबिक संस्थेचा व रचनेचा पूर्णपणे ऱ्हास झालेला आहे असे अजिबात नाही.

## ४.३ विवाह



विवाह

विवाह या सामाजिक संस्थेतून कुटुंबाचा पाया घातला जातो. विवाह म्हणजे समाजमान्य लैंगिक व पुनरुत्पादनाच्या संबंधांची रचना होय. विवाह ही एक सार्वत्रिक प्रथा मानली जाते.

### ४.३.१ व्याख्या

*(१) हॉर्टन आणि हंट :* "दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकत्रित येऊन कुटुंब स्थापन करण्यासाठी समाजाने मान्यता दिलेली रचना म्हणजे विवाह होय."

*(२) रॉबर्ट लोवी :* "समाजमान्य जोडीदारांमध्ये बऱ्याच अंशी कायमस्वरूपी असणाऱ्या सामाजिक बंधाला विवाह असे म्हणता येईल".

*(३) वेबस्टर डिक्शनरी :* "विवाह म्हणजे व्यक्तिगत नाते निर्माण करण्यासाठी दोन व्यक्तींनी जोडीदार म्हणून एकत्र येण्याला मिळालेली कायदेशीर व सामाजिक मान्यतेची प्रणाली होय." (ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात व काही विशिष्ट कायदेशीर अखत्यारित फक्त एक स्त्री व एक पुरुष यांचे जोडीदार म्हणून एकत्र येणे.)

**विवाहाच्या विविध व्याख्यांमधून खालील सामाईक मुद्दे पुढे येतात :**

(i) लैंगिक गरजांची पूर्ती होण्यासाठी निर्माण झालेला

समाजमान्य संबंध म्हणून विवाहाकडे बघितले जाते.

(ii) विवाहाचा मुख्य सामाईक हेतू प्रजनन किंवा मुले जन्माला घालणे हा आहे.

(iii) जोडीदाराची समाजमान्यता यातून भिन्नलैंगिक संबंधांचे तत्व अधोरेखित होते. विवाहाचा प्रमुख हेतू जर प्रजनन मानला असेल तर स्त्री व पुरुषांमधील संबंधच इथे अपेक्षित आहे हे स्पष्ट होते. आज विवाहाची संकल्पना बरीच विस्तृत झाली आहे. समलिंगी संबंधाचाही त्यात अंत:र्भाव होत आहे. समलिंगी विवाह म्हणजे समलिंगी व्यक्तींकडे शारीरिक, भावनिक व लैंगिकदृष्ट्या आकर्षित होणाऱ्या दोन स्त्री किंवा दोन पुरुष म्हणजेच समलिंगी स्त्री अथवा पुरुषांचा विवाह.



## ४.३.२ विवाहाचे प्रकार

कुटुंबाप्रमाणेच जवळपास सर्व मानवी समाजात या ना त्या स्वरूपात विवाह ही संस्था दिसून येते. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर असे दिसून येते की वेगवेगळ्या समाजांमध्ये विवाहाच्या भिन्न स्वरूपाच्या प्रथा व प्रणाली आहेत. विवाहाचे हे विविध प्रकार मुख्यत: जोडीदारांची संख्या तसेच कोण कोणाशी विवाह करू शकतो/शकत नाही. यासंबंधी असणाऱ्या नियमांच्या आधारे दिसून येतात.

**जोडीदारांच्या संख्येच्या आधारे विवाहाचे दोन प्रमुख प्रकार दिसतात.**

**(१)एक विवाह पद्धती :** एक विवाह पद्धती म्हणजे एका वेळी एकाच व्यक्तीशी/जोडीदाराशी होणारा विवाह. या प्रकारात पुरुषाला एका वेळी एकच पत्नी असू शकते किंवा स्त्रीला एकाच वेळी एकच पती असू शकतो. आपल्यातील बहुतांश जणांसाठी एक विवाह हा विवाहाचा सर्वांत परिचित असा प्रकार आहे. आपल्या भोवतालच्या समाजाकडे नजर टाकली की असे दिसून येते की एकविवाह ही सर्वांत मान्यता पावलेली व लोकप्रिय पद्धत आहे. एकदा विवाह केल्यानंतर व्यक्ती शेवटपर्यंत त्याच जोडीदाराबरोबर रहाते. कुटुंबाच्या बहुतांश समाजशास्त्रीय व्याख्यांमध्ये देखील एकविवाह संबंधात असणाऱ्या दोन प्रौढ व्यक्तींमधील कौटुंबिक संबंधच अधोरेखित केलेले दिसतात. अनेक समाजांत एकविवाह पद्धतीला संरक्षण देणारे कायदेही केलेले दिसतात.

**(२)बहुविवाह पद्धती :** यात एकाच वेळी एकापेक्षा जास्ती जोडीदारांबरोबर विवाह केला जातो. बहुविवाह पद्धतीत दोन वेगवेगळे प्रकार आढळतात.

**(i) बहुपती विवाह :** यात एकाच वेळी एका स्त्रीचा विवाह एकापेक्षा अधिक पुरुषांबरोबर होतो. ही पद्धत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्याचा एक मार्ग म्हणून सुरू झालेली असू शकते. अति दारिद्र्य व कंगालपणामुळे एका पुरुषाला पत्नी व मुलांचे पालनपोषण कठीण झाल्यामुळे एकापेक्षा अधिक पुरुषांकडे ती जबाबदारी जाते. अति दारिद्र्यात जगणाऱ्या समूहावर आपली लोकसंख्या मर्यादित ठेवायचा दबावही असतो. अशा परिस्थितीत बहुपती विवाह पद्धती सोईस्कर ठरू शकते.

**(ii) बहुपत्नी विवाह :** यात एक पुरुष एकावेळी

एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करतो. ही प्रथा म्हणजे बलवान पुरुषांसाठी पुनरुत्पादनाच्या साधनावर नियंत्रण ठेवण्याचे व समूहातील नातेसंबंधही स्वतःच्या फायद्यासाठी नियंत्रित ठेवण्याचेच एक साधन आहे.

काही समाजांत व्यक्तींना आपला जोडीदार स्वतः निवडण्याचे स्वातंत्र्य असते. लग्न कधी आणि कोणाबरोबर करायचे हे ठरवण्यात कुटुंब फारशी महत्त्वाची भूमिका बजावत नाही. दुसरीकडे काही समाजात विवाहासंबंधी काटेकोर नियम असतात. कोणी कोणाशी लग्न करायचे किंवा करायचे नाही यासंबंधीचे नियम कडक असतात. त्यामुळे व्यक्तीचे निवडीचे स्वातंत्र्य मर्यादित होते. जोडीदाराच्या निवडीच्या संदर्भातील निर्णय मुख्यत्वे पालक/नातेवाईक घेतात. कोणाचा विवाह कोणाशी होऊ शकतो/शकत नाही या संदर्भात असणाऱ्या नियमांच्या अनुषंगाने विवाहाचे दोन प्रकार दिसतात.

**(i) अंतर्गत विवाह :** यात स्वतःच्या विशिष्ट सांस्कृतिक समूहातील व्यक्तींशी केला जाणारा विवाहच संमत असतो. (उदा., जात, पंथ, आदिवासी जमाती)

**(ii) बहिर्गत विवाह :** यात स्वतःच्या समूहाच्या बाहेरील व्यक्तीशी विवाहाला पसंती असते. उदा. गोत्राबाहेरील विवाह.

**अनुलोम व प्रतिलोम विवाह :** विवाह हा सामान्यतः समान दर्जा असणाऱ्या दोन व्यक्तींचा होतो. वर आणि वधूच्या सामाजिक दर्जावरून अनुलोम आणि प्रतिलोम असे विवाहाचे दोन प्रकार सांगता येतील. म्हणजेच त्या दोघांचा सामाजिक स्तर काय आहे आणि विवाहामुळे तो उंचावणार अथवा खालावणार आहे यावरून विवाहाचे हे दोन प्रकार ठरतात.

अनुलोम विवाह प्रकारात वरच्या जातीतील पुरुषाचा विवाह खालच्या जातीतील स्त्रीबरोबर होतो. या विवाहामुळे त्या स्त्रीचा सामाजिक दर्जा उंचावतो. याविरुद्ध, जेव्हा निम्न स्तरातील पुरुष उच्च स्तरातील स्त्रीबरोबर विवाह करतो तेव्हा हा प्रतिलोम विवाह मानला जातो. या विवाहामुळे कनिष्ठ स्तरातील पुरुषाला वरिष्ठ सामाजिक स्तरामध्ये प्रवेश मिळतो.

**उपक्रम – १**

प्रतिलोम विवाहाला समाजातून मोठ्या प्रमाणात विरोध का होतो याची वृत्तपत्र, बातम्या, चित्रपट इत्यादींच्या साहाय्याने चर्चा करा.

**हे तुम्हांला माहीत हवे**

भारतीय दंडविधानाच्या कलम ३७७ नुसार समलैंगिक संबंध हा गुन्हा ठरवला होता. १८६१ मध्ये ब्रिटिशांनी हे कलम लागू केले. या कलमानुसार समलैंगिकता हा 'अस्वाभाविक गुन्हा' मानण्यात आला व त्यासाठी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. मात्र, ६ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ३७७ कलमातील शिक्षेची तरतूद रद्द केली. प्रौढ व्यक्तींमधील खाजगीत संमतीने होणाऱ्या समलिंगी संबंधांना न्यायालयाने मान्यता दिली आहे. या प्रकारची लैंगिक इच्छादेखील नैसर्गिक असू शकते आणि व्यक्तींचे त्यावर काही नियंत्रण नसते, त्यामुळे या वर्तनाला गुन्हा मानता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

(टाईम्स ऑफ इंडिया, ४ ऑक्टोबर २०१८)

१९८० च्या दशकापासून समलिंगी तसेच लिंग परिवर्तन करून घेतलेल्या व्यक्तींमधील संबंधांची व त्यांच्यातील विवाहाची बरीच चर्चा होत आहे. 'रक्तसंबंधांवर आधारित' कुटुंबाच्या पारंपरिक चौकटीपेक्षा हा 'जाणीवपूर्वक निवड करून निर्माण केलेला' कुटुंब संबंधाचा प्रकार आहे. १९८९ मध्ये

समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता देणारा डेन्मार्क हा जगातील पहिला देश ठरला. औपचारिक, कायदेशीर मान्यता म्हणजे समलिंगी जोडप्यांना सामाजिक मान्यता देण्याचा प्रयत्न तसेच आरोग्य सेवा, वारसा हक्क, मालमत्तेचे अधिकार अशा क्षेत्रांत असे संबंध लक्षात घेऊन या लोकांना सेवा पुरवल्या जाव्यात या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.

**उपक्रम – २**

वर्गात छोटे गट पाडून वृत्तपत्रे, मासिके व इंटरनेटवरील विवाहविषयक जाहिराती बघा. तुम्हांला काय वाटले त्याची एकमेकांबरोबर चर्चा करा. भारतात आजही अंतर्गत विवाहपद्धती लागू पडते असे तुम्हांला वाटते का?

## कुटुंब, नातेसंबंध आणि विवाह

कुटुंब म्हणजे प्रत्यक्ष नातेसंबंधांनी जोडल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह होय. व्यक्तींमधील हे नातेसंबंध विवाहातून किंवा मग रक्तसंबंधाच्या सूत्रामधून जोडले जात असतात. विवाह म्हणजे केवळ दोन प्रौढ व्यक्तींमधील समाजमान्य लैंगिक संबंध एवढाच मर्यादित नसून त्यातून अनेक व्यक्ती एकमेकांशी जोडल्या जातात.

ज्या कुटुंबात व्यक्तीचा जन्म होतो ते त्याचे प्राथमिक कुटुंब असते. तर ज्या कुटुंबात विवाह होतो ते सातत्याचे कुटुंब असते. रक्तसंबंधाने बांधलेले नातेवाईक रक्तसंबंधी म्हणून तर विवाहातून जुळलेले आप्त सगेसोयरे म्हणून ओळखले जातात. आजच्या झपाट्याने बदलत्या युगात देखील, व्यक्तींमध्ये प्राथमिक स्वरूपाचे बंध निर्माण करणाऱ्या व टिकवणाऱ्या संस्था म्हणून कुटुंब, आप्तसंबंध व विवाह संस्थेकडे बघितले जाते.

## ४.४ अर्थव्यवस्था आणि काम

वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि ग्रहण करण्याच्या प्रमुख सामाजिक व्यवस्थेला ‘अर्थव्यवस्था’ असे म्हटले जाते. प्रत्येक समाजाला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी काही भौतिक गरजांची पूर्ती करणे आवश्यक असते. समाजातील सर्व सदस्यांच्या मूलभूत गरजा नीट भागवल्या जाणे गरजेचे असते. आजच्या समाजातील बहुतेक प्रौढ व्यक्तींचा वेळ उदरनिर्वाहाची सोय करण्यातच जातो. त्यामुळे उत्पादन व्यवस्थेबरोबरच एक सक्षम वितरण व्यवस्था खूप आवश्यक आहे. तसेच, समाजातील आर्थिक व्यवस्थेवर अंकुश ठेवणारी एक नियमनात्मक व्यवस्थादेखील महत्त्वाची आहे.

समाजव्यवस्थेतील कुटुंब, धर्म आणि राजकीय व्यवस्थेशी अर्थव्यवस्था जोडलेली असते. आजच्या काळात तर आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थव्यवस्था एकमेकींशी तसेच इतर सामाजिक व्यवस्थांशी पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात जोडलेल्या आहेत.

### ४.४.१ बदलत्या अर्थव्यवस्था

बदलत्या भौतिक गरजांनुसार मानवी समाजाने नवनवीन बदल अंगीकारले आणि याच बदलत्या अवस्थांमधून मानवी समाज विकसित होत गेला आहे. बदलते तंत्रज्ञान, संसाधनांचे संघटन, भौतिक वस्तूंच्या बदलत्या गरजा व त्यानुसार बदलते उत्पादन वितरण या सर्व घटकांचा मानवी विकासात महत्त्वाचा सहभाग आहे. आधुनिक जगाचे सर्वांत लक्षवेधक वैशिष्ट्य म्हणजे तंत्रज्ञानाचा अतिशय वाढत्या प्रमाणावर होणारा वापर आणि त्याचबरोबर भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा झालेला प्रसार होय.

काम आणि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप जाणून घेताना या संक्रमणातील तीन प्रमुख अवस्था लक्षात येतातः

**(१) कृषक क्रांती :**

शिकार करून आणि अन्न गोळा करून

जगणाऱ्या समूहापासून आणि मग पशुपालन अवस्थेनंतर शेतीच्या शोधामुळे मानवी समाजाने एका नवीन प्रगत अवस्थेत प्रवेश केला. कृषिप्रधान अवस्थेत प्राण्यांचा वापर करून नांगरणीसारख्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणावर जमिनीचा वापर शेतीसाठी करून घेणे शक्य झाले. त्यामुळे समाजाची उत्पादकता वाढली. शेती जसजशी प्रगत झाली तसतसे अन्नधान्याचे उत्पादन वाढले, तसेच हस्तव्यवसाय, पशुपालन, अवजारांची निर्मिती अशी विशेषीकरणावर आधारित नवीन क्षेत्रेही विकसित झाली. शेतीला लागणारे तंत्रज्ञान, श्रमविभाजन, कायमस्वरूपी वसतिस्थाने आणि प्रगत व्यापार यांतून अर्थव्यवस्था विस्तारली.

### (२) औद्योगिक क्रांती :

साधारण अठराव्या शतकाच्या मध्यावर प्रथम इंग्लंडमध्ये व नंतर युरोप व अमेरिकेत औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीमुळे सामाजिक व आर्थिक जीवन आमूलाग्र बदलले. औद्योगिकीकरणामुळे चार ठळक आर्थिक बदल घडून आले.

(i) **उर्जेचे नवीन प्रकार** : १७६५ मध्ये जेम्स वॅट यांनी वाफेच्या इंजिनाचा महत्त्वाचा शोध लावला. या शोधामुळे प्राणी व माणसांच्या शारीरिक शक्तीचा उत्पादनातील सहभाग लक्षणीयरीत्या घटला. जैविक शक्तीपेक्षा अनेक पटीने अधिक शक्तिशाली असणाऱ्या या नवीन उर्जेमुळे मोठमोठाली यंत्रसामग्री सहज व जास्त कार्यक्षमरीत्या काम करू लागली.

(ii) **कारखान्यांमध्ये कामाचे केंद्रीकरण** : यंत्रसामग्रीच्या वापरामुळे कारखान्यांची निर्मिती झाली व उत्पादनाचे काम एका छताखाली होऊ लागले. उत्पादनाचे क्षेत्र घरापासून वेगळे झाले. कामाचे ठिकाण नावाचे एक नवीन औपचारिक क्षेत्र निर्माण झाले. लोक आता कामासाठी घराबाहेर पडू लागले. उत्पादनाचे एक नवीन औपचारिक, सार्वजनिक, आर्थिक क्षेत्र ठळकपणे विकसित झाले.

(iii) **मोठ्या प्रमाणावर उत्पादन** : औद्योगिक अर्थव्यवसस्थेत उत्पादनाचे क्षेत्र खूप मोठ्या प्रमाणावर विस्तारले. कच्च्या मालापासून विविध प्रकारच्या तयार वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या या क्षेत्रात अधिकाधिक रोजगार निर्माण होऊ लागला. उदा., कारखान्यांमध्ये घाऊक प्रमाणावर लाकडापासून फर्निचर आणि लोकरीपासून कापड बनवले जाऊ लागले.

(iv) **श्रमविभाजन** : औद्योगिकीकरणापूर्वी एक कारागीर सुरुवातीपासून शेवटपर्यंत एखादी वस्तू एकटा बनवत असे. कारखाना पद्धतीमुळे मानवी कौशल्यांचे महत्त्व कमी झाले. यंत्रांनी फक्त मानवी कौशल्यांची जागा घेतली इतकेच नव्हे तर या पद्धतीत फक्त विशेष कौशल्यांवर आधारित श्रम विभाजनही विकसित झाले. त्यामुळे कारखान्यात काम करणारा कामगार एकाच प्रकारचे काम पुन्हा पुन्हा करतो. त्यामुळे एकीकडे कारखान्यांमुळे एकंदर उत्पादन जरी वाढले आणि कामगारांची उत्पादकता जरी वाढली तरी दुसरीकडे कामगारांच्या कौशल्यांच्या पातळीत निश्चित घसरण झाली.

औद्योगिकीकरणामुळे झालेले बदल फक्त उत्पादन पद्धतीपुरते सीमित नव्हते. हळूहळू संपूर्ण समाजात व्यापक संक्रमण झाले. अगणित नवनवीन वस्तू आणि सेवांमुळे जीवनमानाचा स्तर हळूहळू उंचावत गेला. पण दुसरीकडे औद्योगिक व्यवस्था मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणुकीवर आधारित असल्यामुळे समाजातील आर्थिक दरीही रुंदावत गेली. औद्योगिक तंत्रज्ञान व

उत्पादनाचे फायदे सर्वांपर्यंत समान पद्धतीने पोचले नाहीत. एकीकडे काही कारखानदारांकडे अफाट संपत्ती गोळा होत असताना बहुसंख्य सर्वसामान्य श्रमिक मात्र दारिद्र्याच्या खाईत ढकलले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून श्रमशक्ती संघटित होऊ लागली. पाश्चिमात्य देशांतील सरकारांनी कामगार हिताचे कायदे करावेत यासाठीचा दबाव वाढला. बालकामगार प्रथा बंद करणे, मजुरीचा दर वाढवणे, कामाची परिस्थिती सुधारणे, आरोग्यसेवा, शिक्षण अशा संधी पुरवणे व राजकीय हक्क ओळखणे असे बदल शासनाला करावे लागले.

### (३) माहितीवर आधारित क्रांती :

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्पादनाचे स्वरूप पुन्हा बदलायला सुरुवात झाली होती. स्वयंचलित यंत्रांच्या वापरामुळे उत्पादनातील मानवी श्रमाचे महत्त्व कमी व्हायला लागले होते. जनसंपर्क कार्य, बँका, प्रसारमाध्यमे, विक्री जाहिरात क्षेत्र अशा सेवांवर आधारित क्षेत्रांमध्ये कामगार व व्यावसायिकांचा सहभाग वाढला. या समग्र परिवर्तनाला अधिक चालना देणारा घटक म्हणजे तंत्रज्ञानावर आधारित ही तिसरी क्रांती होय. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे युरोप, अमेरिका व आशिया खंडांतील बऱ्याचशा औद्योगिक देशात कामाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. त्यात तीन प्रकारचे बदल दिसून आले.

**(अ) प्रत्यक्ष वस्तूंकडून कल्पनांच्या निर्मितीकडे :** माहिती युगाच्या अवतरणापूर्वी विविध प्रकारच्या वस्तू व साहित्याच्या उत्पादनावर अर्थव्यवस्था आधारित होती. आज सेवा क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध सेवांची निर्मिती तसेच नवनवीन कल्पना व प्रतिकांच्या निर्मितीचे क्षेत्र वेगाने वाढत आहे. संगणक तज्ज्ञ, लेखक, वित्तीय सल्लागार, वास्तुविशारद, जाहिरात तज्ज्ञ अशा असंख्य व्यावसायिकांबरोबरच दुकानदार व दुकानात काम करणारे मदतनीस, सफाई सेवा पुरवणारे, सुरक्षा सेवा पुरवणारे अशा विविध सेवा देणाऱ्या लोकांना आजच्या माहिती युगातील अर्थव्यवस्थेत महत्त्व आले आहे.

**(ब) यांत्रिक कौशल्यांकडून साक्षरता कौशल्यांकडे** : माहितीवर आधारित क्रांतीमुळे संपर्क क्षमता, लेखन, सादरीकरण, संगणकाचा वापर अशा साक्षरतेवर आधारित कौशल्यांना वाढती मागणी आली आहे. ज्यांच्याकडे या नवीन प्रकारच्या क्षमता आहेत अशा व्यक्तींना आज नवनवीन संधी उपलब्ध आहेत.

**(क) कुठेही बसून काम करण्याची शक्यता :** औद्योगिकीकरणाच्या काळात उत्पादनाचे काम कारखान्यांमध्ये एका छताखाली संघटित झाले. आज संगणक तंत्रज्ञानामुळे कामाचे विकेंद्रीकरण शक्य होत आहे. लॅपटॉप, मोबाइल आणि प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे आज घरी बसून काम करता येणे शक्य झाले आहे व कुठल्याही जागेचे रूपांतर 'कल्पित ऑफिस' मध्ये सहज होऊ शकते.

**उपक्रम – ३**

चार्ली चॅप्लिनचा 'मॉडर्न टाईम्स' हा सिनेमा बघा. मानवी श्रमावर यांत्रिकीकरणाच्या होणाऱ्या परिणामांची चर्चा करा.

## ४.४.२ कामाचे बदलते स्वरूप

प्रगत औद्योगिकीकरणामुळे आज कृषी क्षेत्रात असलेल्या लोकांचे प्रमाण खूप कमी होत आहे. उच्च विकसित देशात शेतीचे काम तंत्रज्ञान व यंत्राच्या साहाय्याने होते. भारतासारख्या देशात अजूनही शेतीवर अवलंबून असणाऱ्या व ग्रामीण

स्वरूपाच्या व्यवसायात असणाऱ्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. अर्थात, भारतात सेवा क्षेत्रही झपाट्याने विस्तारत आहे.

प्रचंड वाढते आर्थिक परस्परावलंबित्व हे आधुनिक समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आज भांडवल, श्रम, कच्चा माल आणि तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीतूनच जागतिक अर्थव्यवस्था कार्यरत आहे. आपण सगळेच आपल्याला लागणाऱ्या वस्तू आणि सेवांसाठी जगभरात पसरलेल्या असंख्य कामगारांवर अवलंबून आहोत. औद्योगिक व्यवस्थेत एक जागतिक उत्पादनाची साखळी निर्माण होत आहे. उदा., एका देशात कच्च्या मालावर प्रक्रिया होते. कारण त्या देशात कच्चा माल स्वस्तात उपलब्ध आहे. पण प्रत्यक्ष वस्तूंचे उत्पादन मात्र ज्या देशात श्रमाचे मूल्य कमी आहे अशा देशात होते. प्रत्यक्ष त्या वस्तूचा खप एखाद्या तिसऱ्याच देशात केला जाणे हेदेखील शक्य आहे. कोकाकोला, कोलगेट, पामोलिव्ह, जनरल मोटर्स आणि अशाच अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या जगभर पसरलेल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चालवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

**बार्बी खरंच कुठली आहे?**

उत्पादनाच्या जागतिक साखळीचे उत्तम उदाहरण म्हणजे जगप्रसिद्ध बाहुली बार्बी. जपानमध्ये आर्थिक मंदीच्या काळात १९५९ मध्ये पहिली बार्बी बनवली गेली. जपान जसा विकसित झाला व तिथल्या मजुरीचे दर जसे उंचावत गेले तशी बार्बी आशियातील इतर देशांत बनू लागली.

बार्बीचे आयुष्य सौदी अरेबियात सुरू होते. जिथे तिच्या प्लॅस्टिकच्या शरीरासाठी आवश्यक असणारे इथिलिन बनते. तैवानमधील फॉर्मोसा प्लॅस्टिक या कंपनीत इथिलिनपासून तिचा प्लॅस्टिक पी.व्ही.सी.चा ढाचा बनतो. हे पुढे चीन, मलेशिया व इंडोनेशियातील कारखान्यांकडे पाठवले जातात. जिथे बार्बीचे शरीर आकाराला येते.

बार्बीचे नायलॉनचे केस जपानमध्ये बनतात, तर तिचे कपडे चीनमध्ये तयार होतात. मग ही बार्बी खरोखर कुठली म्हणायची?

बार्बीचे डिझाईन अमेरिकेत केले जाते, तिथेच विक्री आणि खपाची धोरणे बनतात आणि तिथेच सर्वाधिक नफाही मिळतो. पण बार्बीशी संबंधित फक्त थोड्याच गोष्टी अमेरिकेत बनतात ती म्हणजे बार्बीला नीट ठेवायला वापरली जाणारी खोकी व तिला सुशोभित करायला लागणारे काही रंग व तेल.

Source : Anthony Giddens : Sociology, Polity, 2008

उत्पादन केंद्रीय 'असेंब्ली लाइन' पद्धतीने होत होते. कामगार एका जागेवर फिरत्या यांत्रिक पट्ट्यासमोर उभे राहून काम करत आणि त्यांच्या कामावर काटेकोर देखरेख व नियंत्रण असे. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत काम पूर्णपणे विकेंद्रित झाले आहे. कंपन्या आणि देशांमधील वाढत्या स्पर्धेमुळे उत्पादनात लवचीकता असणे ही काळाची गरज बनली आहे. याचा अर्थ असा की, उत्पादनातील विविध प्रकारची कामे जगाच्या वेगवेगळ्या देशांमधून करून घेणारी

## ४.५ शिक्षण

व्यक्तींमधील क्षमतांचा विकास व या क्षमता प्रत्यक्ष कार्यान्वित करणे म्हणजे शिक्षण असा या संज्ञेचा शाब्दिक अर्थ आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत केवळ जगण्यासाठी नव्हे तर जास्त अर्थपूर्ण आयुष्य जगण्यासाठी ज्ञान व कौशल्यांची प्राप्ती करणे अपेक्षित आहे. ठळकपणे बघायचे तर औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने आयुष्यभर चालणारी

शिकण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. यादृष्टीने पाहता अप्रगत समाजात शिक्षण हा सामाजीकरणाचा व संस्कृती-हस्तांतरणाच्या व्यापक प्रक्रियेचाच एक भाग होता. मूलभूत सांस्कृतिक हस्तांतरणाचे व प्रसाराचे – योग्य वर्तन पद्धती, मूल्य आणि नियमने, भाषा तसेच मूलभूत उपयुक्त कौशल्ये पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याचे काम कुटुंब व निकटच्या समूहांतूनच होत होते. औद्योगिकीपूर्व समाजात घर हेच उत्पादनाचे केंद्र होते आणि लोकांची दिनचर्या घर आणि परिसराशीच बांधलेली असल्यामुळे शिक्षणासाठी वेगळी अशी व्यवस्था असावी अशी निकड नव्हती.

पण जसजसे औद्योगीकरण झाले आणि वाढले तसतसे साक्षर आणि सुशिक्षित व्यक्तींसाठीची मागणी वाढली. यातून शिक्षण व्यवस्थेची गरज निर्माण झाली. आधुनिक समाजात गुंतागुंतीची श्रम विभाजन व्यवस्था आहे, काम आणि घर अशी वेगवेगळी क्षेत्रे आहेत त्यामुळेच काही विशिष्ट कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. अशा बदलत्या व्यवस्थेत एका औपचारिक व सुस्पष्ट शिक्षण व्यवस्थेची गरज आहे.

आधुनिक समाजात खालील मूलभूत उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विशेष शिक्षण व्यवस्था कार्यरत आहे.

- ज्ञान आणि कल्पनांची निर्मिती आणि प्रसार करणे.
- समाजाच्या कल्याणासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करून कौशल्यांचा विकास करणे.

शिक्षण ही म्हणूनच एक व्यापक, बहुआयामी प्रक्रिया आहे. यात व्यक्तीच्या मनोज्ञ ग्रहणाच्या कक्षा रुंदावण्याबरोबरच उपलब्ध ज्ञानाचा वापर करणे तसेच चिकित्सा करून या ज्ञानात नवीन भर टाकण्याच्या क्षमतेचा विकास होणे याचाही अंतर्भाव आहे.

## ४.५.१ शिक्षणाचे प्रकार

**(१) औपचारिक शिक्षण :** काही विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी औपचारिक शिक्षण नियोजन केले जाते. म्हणूनच यात प्रत्यक्ष पाठ आणि शिक्षणाचा अंतर्भाव होतो. विशिष्ट उद्दिष्ट समोर असल्यामुळे औपचारिक शिक्षणाला विशिष्ट कालमर्यादा असते. एक सुस्पष्ट व काटेकोरपणे तयार केलेला अभ्यासक्रम असतो. हा अभ्यासक्रम बनवताना समाजाच्या गरजांचा विचार केलेला असतो.

**(२) सहज शिक्षण :** सहज शिक्षणाच्या प्रक्रियेत कुठल्याही संघटित व्यवस्थेशिवाय व्यक्तींचे शिक्षण होते. मूल्यसंवर्धन, क्षमता विकास, सकारात्मक दृष्टिकोनाची निर्मिती आणि ज्ञानवृद्धीचे कार्य अतिशय सहज व नैसर्गिकरित्या पार पाडले जाते. सहज शिक्षणात, पालक आणि ज्येष्ठांकडून तरुण पिढीला परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा समावेश होतो. सहज शिक्षणासाठी ठरावीक अभ्यासक्रम किंवा वेळापत्रक किंवा मुद्दाम नेमून दिलेली यंत्रणा नसते. यादृष्टीने सहज शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. रोजच्या जीवनात काम/व्यवसाय, प्रवास, प्रसारमाध्यमे अशा विविध क्षेत्रांतून आपण सतत नवीन अनुभव घेत असतो व शिकत असतो.

**(३) अनौपचारिक शिक्षण :** अनौपचारिक शिक्षण औपचारिक व्यवस्थेच्या कक्षेत येत नाही. तरीही ते अगदी पूर्णपणे सहज आणि असंरचित नसते. औपचारिक शिक्षण व्यवस्थेच्या चाकोरीबाहेरचे सर्व प्रकारचे शैक्षणिक उपक्रम अनौपचारिक शिक्षणात मोडतात. एका छोट्या, एकजिनसी स्वरूपाच्या गटाच्या विशिष्ट शैक्षणिक गरजांना समोर ठेवूनच अनौपचारिक शिक्षण राबवले जाते. मुद्दाम जाणीवपूर्वक निर्मिती केल्यामुळे व

राबवले गेल्यामुळे अभ्यासक्रम आणि मूल्यमापनाच्या बाबतीत अनौपचारिक शिक्षणाच्या आराखड्यात लवचीकता असावी लागते.

### ४.५.२ शिक्षणाचे महत्त्व

समाजशास्त्रज्ञांसाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा विषय का आहे? एमील डरखाईम व टॅलकॉट पार्सन्स यांसारख्या समाजशास्त्रातील प्रमुख विचारवंतांनी व्यक्ती आणि समाज या दोहोंसाठी असणाऱ्या शिक्षणाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला आहे.

शिक्षण व्यवस्थेची काही कार्ये खालीलप्रमाणे निर्देशित करता येतील :

(i) वैविध्यपूर्ण कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीतून आलेल्या मुलांना शालेय शिक्षणातून समाजातील समान वैचारिक नीतिमूल्यांची ओळख होते. यातूनच खूप वेगवेगळ्या असणाऱ्या व्यक्तींना एकत्र बांधण्याचे काम होत असते.

(ii) शिक्षणातून मुलांना स्वयंशिस्तीचे धडे मिळतात. समाज सुरळितपणे चालण्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक नियम मुले शिकतात व अंगी बाणवतात.

(iii) अत्यंत गुंतागुंतीच्या असणाऱ्या आधुनिक अर्थव्यवस्थेला लागणारी कौशल्ये शिक्षण व्यवस्थेमार्फत शिकवली जातात. उदा., तांत्रिक/व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण संस्थांची निर्मिती केली जाते. आजच्या काळात रोजगारासाठी विशिष्ट ज्ञान व कौशल्यांची पातळी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एक मूलभूत बुद्धि बैठक तयार करण्याबरोबरच या गरजेचीही पूर्ती उच्च शिक्षण व्यवस्थेला करावी लागते. उच्च शिक्षणातून ठरावीक दर्जाचे ज्ञान व कौशल्ये विद्यार्थ्यांना दिली जातात.

(iv) मुलांमध्ये यशसिद्धीचे मूल्य जोपासण्याचे कामही शाळा करत असतात. शाळेत काही मूलभूत सार्वत्रिक मूल्यमापनाच्या कसोटीवर मुलांचे मूल्यमापन केले जाते. शाळांच्या औपचारिक नियमांच्या मापदंडानुसार मुलांच्या वर्तनाचेही मूल्यमापन होते. परीक्षेतील त्यांच्या कामगिरीवर त्यांच्या यशाचे मोजमाप केले जाते. बाहेरील समाजाप्रमाणेच शाळांमध्येही बौद्धिक क्षमतेवर आधारित व्यवस्था असते. म्हणजे ज्यांच्यात जितक्या क्षमता आणि कौशल्ये आहेत त्याप्रमाणेच त्यांना पारितोषिक/उचित प्रतिफळ मिळते.

### ४.५.३ शिक्षण आणि सामाजिक विभाजन

ज्या समाजशास्त्रज्ञांनी समाजाकडे विभाजित व विषम स्वरूपात बघितले आहे, त्यांच्यासाठी शिक्षण व्यवस्था, सर्व पातळ्यांवर सामाजिक विषमता टिकवून ठेवण्याचेच साधन आहे. बॉवेल्स व जिंटीस (२००२) यांच्या मते, बाहेरच्या आर्थिक जगात जी विषमता आहे तिला पूरक अशीच शाळांमधील व्यवस्था असते. बोर्द्यू (१९८६) ने शिक्षण व अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. उच्च वर्गाचे आर्थिक वर्चस्व टिकवण्यात महत्त्वाचे योगदान देण्याबद्दल त्यांनी शिक्षण व्यवस्थेवर टीका केली आहे. या विचारवंतांच्या मते, शाळांमधील व्यवस्थाच अशी असते की, निम्न स्वरूपाच्या रोजगारात/व्यवसायात जाऊ शकतील असे मानले गेलेल्या मुलांकडून काही विशिष्ट वर्तन अपेक्षित असते. त्यांनी नियमांचे व शिस्तीचे काटेकोर पालन करावे असे अपेक्षित असते. त्यांना तुलनेने सोप्या सरावावर आधारित गोष्टी करायला दिल्या जातात. दुसरीकडे जी मुले उच्च स्तर वा श्रेणीतील व्यवसायांमध्ये जातील असे गृहीत धरलेले असते अशा मुलांमध्ये स्वतंत्र विचार व काम करण्याची क्षमता निर्माण होईल याची काळजी घेतली जाते. मुलांची सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन एक सर्वसाधारण अभ्यासक्रम

तयार करण्याचा कल असतो. आपल्या सामाजिक-आर्थिक कुवतीनुसार आपण शाळेची निवड करत असतो आणि म्हणूनच आपल्याला वेगवेगळ्या प्रकारच्या संधी व विशेष अधिकार प्राप्त होत असतात.

अनेक अभ्यासांतून असेही दिसून आले आहे की, शिक्षण व्यवस्थेतून लिंगभावात्मक विषमताही टिकवून ठेवली जाते. गेल्या काही दशकांत शिक्षणातील 'लिंगभावात्मक दरी' कमी होत असली तरी लिंगभेद समान शैक्षणिक संधी पुरवण्यातील मोठा अडथळा आहे. मुलींपेक्षा मुलांच्या शिक्षणाला दिले जाणारे प्राधान्य किंवा मुलींमध्ये असणारे शालेय गळतीचे उच्च प्रमाण किंवा मुलींसाठी काही विशिष्ट 'सोपे' विषय निवडीसाठी ठेवणे या सर्वांतून आजही शिक्षणातील लिंगाधारित विषमता स्पष्ट होते.

**उपक्रम - ४**

शाळेत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये लिंगाधारित भेद दिसतो का ते शोधा व चर्चा करा. उदा., मुलींना रांगोळी काढण्याचे किंवा पाहुण्यांचे स्वागत करण्याचे काम दिले जाते, तर मुलांना फर्निचर हलवण्याचे किंवा बैठक व्यवस्थेत मदत करण्याचे काम दिले जाते.

**परिक्षण करा**

'मेरिटोक्रसी मिथ' (२००४) या पुस्तकात स्टीफन मॅकनमी यांनी आपल्याला समाज खूप न्याय्य पद्धतीने चालतो या भ्रमाविषयी सावध केले आहे. समाजात प्रत्येकाला आपल्या गुणवत्तेनुसार व पात्रतेनुसार मिळते असा एक दावा केला जातो. पण त्यांच्या मते, वारसा हक्क, सामाजिक व सांस्कृतिक भांडवल तसेच सामाजिक विषमता असे अनेक घटक व्यक्तिगत गुणवत्तेला मारक ठरतात. पात्रता असूनही व्यक्तीला त्याप्रमाणे स्थान मिळेलच असे नाही.

**खालील तक्त्याकडे पहा!**

**साक्षरतेचे प्रमाण (टक्केवारी)**

| जनगणना वर्ष | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३ | २७.२ | ०८.९ |
| १९६१ | २८.३ | ४०.४ | १५.४ |
| १९७१ | ३४.५ | ४६.० | २२.० |
| १९८१ | ४३.६ | ५६.४ | २९.८ |
| १९९१ | ५२.२ | ६४.१ | ३९.३ |
| २००१ | ६४.८ | ७५.३ | ५३.७ |
| २०११ | ७३.० | ८०.९ | ६४.६ |

**१९५१-१९७१: ५ आणि वरील वयोगट**
**१९८१-२०११: ७ आणि वरील वयोगट**
(Data Source: Office of the Registrar General & Census Commissioner, India)

**उपक्रम - ५**

लोकप्रिय आणि यशस्वी व्यक्तींची माहिती गोळा करून नोंद वही तयार करा. शिक्षणाच्या आधारे समाजात यश व स्थान प्राप्त करता येते का हे जाणून घ्या.

समाज आपली घडी सुव्यवस्थित राखण्यासाठी विविध उपव्यवस्थांची निर्मिती कशी करत असतो हे या पाठात आपण पाहिले. या प्रत्येक संस्थेचे समाजासाठी काय स्वरूपाचे योगदान आहे ते समजून घेण्यास या पाठातून मदत होईल.

## सारांश

- सुस्पष्ट, स्थिर वर्तन आकृतिबंधांच्या व्यवस्थेला सामाजिक संस्था असे म्हटले जाते.
- सामाजिक संस्था हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य, प्रसारमाध्यमे, कायदा, अर्थव्यवस्था अशा विविध सामाजिक संस्थांनीच समाज बनलेला आहे. या संस्थांचे सदस्य म्हणूनच व्यक्ती एकमेकांबरोबर वागत असतात.
- कुटुंब हा मानवी समाजाचा सर्वांत प्राथमिक घटक आहे. सामाजीकरण, लैंगिक वर्तनाचे नियंत्रण, भौतिक व भावनिक सुरक्षितता तसेच व्यक्तीची सामाजिक ओळख निर्माण करणे अशी काही अत्यंत मूलभूत स्वरूपाची कार्ये कुटुंब संस्था पार पाडत असते.
- एक सामाजिक संस्था म्हणून कुटुंबात आज खूप बदल होत आहेत आणि अनेक नवीन स्वरूपाचे कौटुंबिक संबंध निर्माण होत आहेत.
- कौटुंबिक नातेसंबंधांची सुरुवात विवाह या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून होते. लैंगिक संबंधांना व प्रजननाला समाजात मान्यता प्राप्त करून देणारी व्यवस्था म्हणजे विवाह संस्था होय.
- कुटुंबाप्रमाणेच जवळपास सर्व समाजांत कुठल्या ना कुठल्या स्वरूपात विवाह संस्था आढळते. ऐतिहासिक दृष्टीने पहाता, विविध समाजांत विवाहाचे वैविध्यपूर्ण प्रकार अस्तित्वात असलेले आढळतात. जोडीदारांची संख्या तसेच कोणी कोणाशी विवाह करावा यासंबंधीच्या नियमांना अनुसरून विवाहाचे विविध प्रकार दिसून येतात.
- वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि ग्रहण करण्याची मूलभूत व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय. समाजाचे अस्तित्व कायम टिकवण्यासाठी काही मूलभूत भौतिक गरजांची पूर्ती होणे आवश्यक आहे, जी अर्थव्यवस्थेतून होते.
- कृषक क्रांती, औद्योगिक क्रांती आणि माहिती तंत्रज्ञानातील क्रांती या तीन ठळक संक्रमण अवस्थांच्या माध्यमातून काम आणि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप समजू शकते.
- वाढत्या औद्योगिकिकरणामुळे शेतीवर आधारित लोकसंख्येचे प्रमाण घटत आहे. उच्च विकसित देशांमध्ये शेतीचे यांत्रिकीकरण झाले आहे आणि तिथे शेतीसाठी मुख्यतः यंत्रे आणि विकसित तंत्रज्ञान वापरले जाते. भारतासारख्या देशात आजही शेती आणि ग्रामीण उद्योगधंद्यांवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण लक्षणीय आहे.
- आधुनिक समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक परस्परावलंबनाचे वाढते प्रमाण. आज भांडवल, श्रम, कच्चा माल व तंत्रज्ञानाच्या जागतिक पातळीवरील देवाणघेवाणीतून जागतिक अर्थव्यवस्था काम करते.
- आधुनिक समाजात विचार व ज्ञाननिर्मिती तसेच आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची महत्त्वाची उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून शिक्षण संस्था विकसित झाली आहे.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. आपल्या गटाअंतर्गत विवाह करण्याच्या नियमानुसार केलेल्या विवाहाला ............. म्हणतात.
(अंतर्गत विवाह, बहिर्गत विवाह, बहुपती विवाह)

२. दोन किंवा दोनापेक्षा जास्त पिढ्यांच्या कुटुंबाला ............. असे म्हटले जाते.
(विभक्त कुटुंब, संयुक्त कुटुंब, एकल पालक कुटुंब)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) शाळा – दूर शिक्षण
(ii) समवयस्क समूह – सहज शिक्षण

(iii) आरोग्य सेवा प्रशिक्षण - अनौपचारिक शिक्षण

(iv) कुटुंब - सहज शिक्षण

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| समलैंगिक, मातृगृहीय, भिन्न लिंग लैंगिकता |
|---|

१. विवाहानंतर वर/पती हा वधू/पत्नी च्या घरी रहायला जाणे.

२. समान लिंग असणाऱ्या व्यक्तींचा विवाह.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. 'अ' व्यक्तीने 'ब' व्यक्तीसोबत विवाह केला. त्यानंतर त्यातील स्त्रीने तिच्या जोडीदारापासून घटस्फोट घेऊन 'क' व्यक्तीशी विवाह केला. हे बहुपती विवाहाचे उदाहरण आहे.

२. कृषक समाजात मोठ्या प्रमाणात उत्पादन व कारखाना पद्धती आढळून येते.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. विवाहानंतरचे निवासस्थान

२. अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्रम

**(ब) टीपा लिहा.**

१. कुटुंबांतर्गत अधिकाराच्या आधारे कुटुंबाचे प्रकार

२. अर्थव्यवस्थेच्या अवस्था

३. शिक्षणाचे महत्त्व

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. मातृसत्ताक कुटुंब व पितृसत्ताक कुटुंब

२. कृषी क्रांती व औद्योगिक क्रांती

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. एकत्र राहणे/सहवास

२. औपचारिक शिक्षण

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. आधुनिक समाजात पालकांच्या भूमिकेत बदल होत आहेत.

२. भारत औद्योगिक क्रांतीच्या संक्रमण अवस्थेत आहे.

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

१. प्रेम विवाहाबद्दल तुमचे विचार काय आहे? तुम्ही प्रेमविवाहाचे समर्थन करता काय? स्पष्ट करा.

२. माहितीच्या क्रांतीचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव/परिणाम झाला आहे?

**प्र.७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५०-२०० शब्द)**

१. सद्यपरिस्थितीमध्ये कुटुंबाची भूमिका बदलली आहे. तुमच्या स्वतःच्या उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

**उपक्रम**

तुमच्या स्मरणशक्तीचा वापर करून तुमचा लहानपणापासूनचा प्रवास आठवून तुम्ही व्यक्ती म्हणून घडताना तुमची आवड, आव्हाने, यश-अपयश पडताळण्याचा प्रयत्न करा व यामध्ये कुटुंब, शाळा, धर्म यांचा तुमच्यावर कसा प्रभाव पडला ह्याची नोंद घ्या.

***